imma™

Punyanagari

MIT-LRA to inaugurate City Beautification Through Lighting

Date: 19-02-2008 | Edition: Pune | Page: 3 | Source: Bureau | Clip size (cm): W: 13 H: 10

Clip: 1 of 1

# ‘योग्य प्रकाशासाठी शास्त्रशुद्ध दृष्टिकोनाची गरज’

पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) – ‘प्रकाश ही मानवाची गरज आहे आणि त्यातून सौंदर्यही निर्माण होते. मात्र, त्यासाठी शास्त्रशुद्ध आणि कलात्मक दृष्टिकोनाची गरज आहे,’ असे मत पुण्याच्या विप्रो लायटिंगच्या सी अ‍ॅण्ड आय बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कोचर यांनी व्यक्त केले. पुण्याच्या माईर्स एमआयटी लायटिंग रिसर्च अ‍ॅकॅडमीने आयोजित केलेल्या प्रकाश योजनेद्वारे शहर सौंदर्यवर्धनाविषयी आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन करताना ते बोलत होते. माईर्स एमआयटीचे संस्थापक, संचालक प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी आस्ट्रेलियामधील सिडनी विद्यापीठाचे अधिष्ठाता व प्रकाशविषयक अभ्यास संचालक प्रा. डॉ. वॉरेन ज्युलियन, ऑस्ट्रेलियातील एशिया पॅसिफिक कार्यालयातील आंतराष्ट्रीय डार्क स्काय असोसिएशनचे प्रमुख रिजनाल्ड आर. विल्सन, एफआयईएस प्रा. डॉ.सुनील कराड, प्रा. डॉ. प्रकाश बरजातिया आणि डॉ. संजय भाले उपस्थित होते.

कोचर म्हणाले, मानवी जीवनात प्रकाशाची भूमिका फार महत्त्वाची आहे. जर शहरे सुंदर झाली, तर नागरिकांना त्यांची घरे व वसाहती सुंदर करण्यास प्रेरणा मिळते. या प्रक्रियेत चार घटक समाविष्ट आहेत. लोकप्रतिनिधी, प्रशासन, लायटिंगच्या क्षेत्रातले तज्ज्ञ आणि आमच्यासारखे औद्योगिक क्षेत्रामधील लोक. या सर्वांनी सुसूत्रतेने काम केले, तर शनिवारवाडा, लाल किल्ला यांच्यासारखी ऐतिहासिक स्थळेसुद्धा सुंदर होतील, शहराची भूषणच होतील. वाहतुकीची कार्यक्षमता वाढेल. दुकाने आणि मॉल्स सौंदर्याकडे अधिक लक्ष देतील. घराच्या प्रकाशयोजनेमध्ये गरज आणि सौंदर्य या दोन्ही गोष्टी उपयोगी आहेत. प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, देशामध्ये विजेचा तुटवडा आहे. प्रकाशविषयक उद्योगधंद्यांनी कमी विजेवर चालणाऱ्या व अधिक प्रकाश देणाऱ्या उपकरणांचे संशोधन व उत्पादन करावे. रस्त्यावरच्या दिव्यांच्या खांबांची रचनासुद्धा अशी असावी की, त्यांची उंची व दिव्याचा प्रकाश यांचे संतुलन राहील.

शासनाच्या वतीने पायाभूत सुविधांसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात, परंतु अशा सुविधांची विशेषत: रस्त्यावरील दिव्यांची विशेष निगा राखली जाणे आवश्यक असल्याचे ऑस्ट्रेलियातील युनिव्हर्सिटी ऑफ सिडनीचे संचालक प्रा. डॉ. वॅरेन ज्युलियन यांनी सांगितले.